मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थदीप

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे

४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

जे. ई. एस. कॉलेज, जालना








मुख्यसंपादक

प्रोफेसर दिलीप अर्जुने

Online on https://jesjalna.org/economics/index.html

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
## दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

## अर्थदिप स्मरनिका

प्रमुख संपादक
प्रोफेसर दिलीप सोपान अर्जुने

संपादक
प्रा. एम जी. हिंगे
प्रा. बी. डी. तोटरे
डॉ. बी. पी. वाघ

मुख्य मार्गदर्शक
प्रोफेसर आर. एस. सोळुंके

आयोजक
जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान
महाविद्यालय, जालना

ऋत प्रकाशन जालना

# अर्थद्विप स्मरनिका

मुख्य पृष्ठ: बाबू तोटरे

अक्षर जुळवणी : प्रा. एम जी. हिंगे

ISBN: 978-93-84663-34-6
ऋत प्रकाशन जालना

किंमत: ००

ऋत प्रकाशन जालना

# अर्थशास्त्रीय प्रायोगिक पद्धती आणि उपभोक्त्याच्या वर्तनाचे विश्लेषणात्मक अध्ययन.....

डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे
अर्थशास्त्रविभाग प्रमुख
डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव
आजीव सभासद क्र-1752
Mail Id - vinodnannavare88@gmail.com

प्रस्तावना -

अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय "दुर्मिळ साधन संपत्तीचे विवेकपूर्ण व्यवस्थापन" हा आहे. कारण वास्तविक अर्थशास्त्राच्या मुख्य अभ्यास विषयात वस्तूचे उत्पादन, विभाजन, विनिमय व उपभोग हे भाग आहेत. आणि त्यामुळे मानवी वर्तनाचा अभ्यास करत असतांना व्यक्ती वर्तन कोणत्या परिस्थितीत कसे बदलते. व त्याचा परिणाम त्याच्या खरेदी शक्तीवर कसा होतो. व्यक्ती वेगवेगळ्या परिस्थितीत व्यक्ती वर्तन हे कशा पद्धतीचे असेल आणि तो कशा पद्धतीने आपल्या स्वभावात आपल्या वर्तणुकीत बदल करेल याचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र आहे. म्हणूनच अर्थशास्त्र विज्ञान आहे की कला याचा ज्यावेळेस अर्थशास्त्राचे अभ्यासक अभ्यास करतात. त्यावेळेस लक्षात येते की, अर्थशास्त्रात इतर परिस्थिती कायम असेल तर अर्थशास्त्राचे नियम विज्ञानाप्रमाणे सत्य ठरतात. आणि त्यामुळेच अर्थशास्त्र हे विज्ञान ठरते. परंतु ते नियम वास्तवात आण्यासाठी कलेची जोड मिळाली तर अर्थशास्त्र काही अंशी विज्ञान तर काही अंशी कला ठरते. ज्या पद्धतीने ते विज्ञान ठरते त्या पद्धतीनेच ते कला देखील ठरते कारण अर्थशास्त्रात कशा पद्धतीने जीवन पद्धती व्यतीत केली पाहिजे कशा पद्धतीने जीवन जगले पाहिजे याचे अत्यंत महत्त्वपूर्ण अध्ययन करता येते आणि त्यामुळेच अर्थशास्त्र काही अंशीकला देखील आहे.आणि म्हणूनच अर्थशास्त्र काही अंशी विज्ञान व काही अंशी कला आहे. त्यामुळेच सदरील संशोधन करत असताना अर्थशास्त्र हे प्रायोगिक आहे. हेआजच्या परिस्थितीत ते फक्त उपभोक्ता वर्तनाच्या संदर्भात किंवा व्यक्ती उत्पन्नाच्या संदर्भात किंवा व्यक्तीच्या खर्च करण्याच्या प्रवृत्तीत झालेल्या वाढीच्या संदर्भात संशोधक अभ्यासणार आहे. कारण अलीकडील काळात व्यक्तीचे उत्पन्न ज्या पद्धतीने वाढत आहे. त्या पद्धतीने किंवा त्यापेक्षा कितीतरी पटीने महागाई वाढलेली आपल्याला दिसून येते. महागाई सोबतच अनेक वस्तू व सेवांचे किमती या वाढलेल्या दिसून येतात. त्यामुळेच अर्थशास्त्र जे आपल्याला सांगते की, वस्तूची किंमत वाढली म्हणजेत्या वस्तूला असणारी मागणी कमी केली जाते परंतु आजची परिस्थिती लक्षात घेता अनेक व्यक्ती किंवा उपभोक्ते अनेक वस्तूंच्या किमती या वाढत असताना देखील सातत्याने वाढत्या किमतीचा कोणत्याही प्रकारे विचार नकरता त्याला मोठ्या प्रमाणात मागणी करताना दिसून येत आहेत. याचाच अर्थ आजच्या परिस्थितीत हे जे आपल्याला अलीकडील काळात दिसून येत आहे. तो प्रायोगिक अर्थशास्त्राचा एक भाग आहे की, अनुकरणशिलतेचा प्रभाव आहे. हे अभ्यासणे संशोधकाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. कारण अलीकडील काळात अर्थशास्त्रातील ड्युजेनबेरी यांचा प्रदर्शन परिणामाचा सिद्धांत व्यक्तीची खरेदी शक्ती मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. परिणामी व्यक्तीला आपले जीवन जगत असतांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उदा.दारिद्र्यात होणारी वाढ हि काही प्रमाणात प्रदर्शन परिणामाचे देखील फलित

असल्याचे आपल्याला दिसते कारण अनुकरण शीलतेमुळे व्यक्ती आपल्या अल्प उत्पन्नाच्या आधारे देखील अत्यंत महागड्या वस्तू खरेदी करणे पसंत करतो किंवा आपल्या आवाक्या बाहेरच्या वस्तूंना पसंती दर्शवितो. त्यामुळेच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होऊन दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात तो अडकत जातो.

आर्थिक प्रवैगिक (Economic Dynamic)प्रवैगिक ह्या शब्दाचा पदार्थविज्ञानशास्त्रातील अर्थ सातत्याने होणाऱ्या बदलाची अवस्था (Position of continuous change)किंवा विश्रांतीचा अभाव (Absence of rest)असा आहे. तर अर्थशास्त्रात प्रवैगिक शब्दाचा अर्थ आर्थिक उत्क्रांती असा केलेला आहे.

आर्थिक प्रवैगिकाची व्याख्या:-

आर्थिक प्रवैगिक अशी पद्धती आहे की, ज्या पद्धतीत सर्व बदल, कालविलंबना (Time lags)क्रम, एकत्रित परिमाणे आणि अपेक्षा यांची मोजणी करून विश्लेषण केले जाते. याविश्लेषण पद्धतीत इतर परिस्थिती समान असताना (Ceteris Peribus) गृहित नकरता विवेचन केले जाते. आर्थिक प्रवैगिकाच्या निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

प्रो. लिप्से –

अर्थव्यवस्थेच्या वर्तणुकीचा असंतुलनाच्या परिस्थितीतील अभ्यास म्हणजे आर्थिक प्रवैगिकी होय.

प्रो. रेग्नर फ्रिच-

एखादी विश्लेषण पद्धती प्रवैगिक तेव्हाच असते की, जेव्हा त्या विश्लेषण पद्धतीची वर्तणूक निरनिराळ्या कालावधीतील अस्थिरांच्या फलनात्मक संबंधाने दर्शविली जाते.

प्रवैगिक पद्धतीच्या यानिरनिराळ्या व्याख्यांवरून असाच अर्थबोध होतो की, प्रवैगिक पद्धती ही अर्थव्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपाचे अध्ययन करणारी पद्धती आहे. व्यष्टी अर्थशास्त्रात प्रवैगिक विवेचनाचे उदाहरण किंमतीच्या मागणी व पुरवठ्याशी असलेल्या संबधाद्वारे देता येईल.

तुलनात्मक किंवा सापेक्ष उत्पन्न गृहीतक -

सापेक्ष उत्पन्न गृहीतक ब्रँडी, फ्रीडमन व ड्युजेनबेरी यांनी विकसित केले. ड्युजेनबेरी यांनी 1949 मध्ये त्यांच्या Income, Saving & The Theory of Consumer या पुस्तकात मांडली. आणि त्यात त्यांनी म्हटले की,उपभोग खर्च हा स्वतंत्रपणे/ स्वायत्तपणे केला जातो. उपभोग खर्चात त्वरित बदल केले जातात. यासंदर्भात ड्युजेनबेरी यांनी म्हटले आहे की, प्रत्येक व्यक्तीचे उपभोग वर्तन स्वतंत्र नसून त्याच्यावर दुसऱ्या व्यक्तीच्या उपभोगाचा वर्तनाचा परिणाम होतो.असे म्हटले आहे.

सापेक्ष उत्पन्नाचीतुलना करता व्यक्तीच्या उत्पन्नात झालेला बदल होय. ही संकल्पना पुढील प्रमाणे उदाहरणाने स्पष्ट करता येते. समजा, 'अ' व 'ब' यादोन व्यक्ती आहेत. 'अ' व्यक्तीच्या उत्पन्नात व 'ब' व्यक्तीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. समजा, 'अ' व्यक्तीच्या उत्पन्नात तुलनेने अधिक वाढ झाली आहे व 'ब' व्यक्तीने आपला उपभोग बदललेला नाही तेव्हा 'अ' व्यक्ती उपभोग विषयक निर्णय घेताना केवळ आपल्या उत्पन्न पातळीतील बदल विचार घेतो असे नाही तर 'ब' व्यक्तीने आपल्या उपभोगात फार मोठे बदल केले नसतील तर 'अ' व्यक्ती देखील आपल्या उपभोगात फार मोठे बदल करत नाही. थोडक्यात, व्यक्ती आपले उपभोग निर्णय केवळ आपल्या निरपेक्ष उत्पन्ना नुसार घेत नसून इतर व्यक्तीच्या उत्पन्नाशी तुलना करून सापेक्ष उत्पन्नानुसार घेत असते.

अनुकरण परिणाम:

उपभोग खर्च हा केवळ त्या कुटुंबाच्या उत्पन्न पातळीवर अवलंबून असत नाही, तर दुसऱ्याच्या उच्च उपभोग वर्तवणुकीचा त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. श्रीमंत वर्गाची सरासरी उपभोग प्रवृत्ती ही कमी

असते, तर गरीब वर्गाची सरासरी उपभोग प्रवृत्ती अधिक असते. कमी उत्पन्न गटातील कुटुंबे नेहमी उच्च उत्पन्न गटातील कुटुंबाच्या उपभोग सवयीकडे आकर्षित होतात व त्यांचे अनुकरण करतात / श्रीमंत व्यक्तीच्या जीवनस्तराचे अनुकरण करतात. श्रीमंत व्यक्तीच्या जीवनस्तराचे अनुकरण करण्याच्या या सवयीला अनुकरण परिणाम म्हणतात. या प्रवृत्तीमुळेच गरीब गटातील व्यक्ती आपल्या उत्पन्नातील मोठा हिस्सा उपभोगावर खर्च करतात. म्हणूनच अविकसित देशांतील सरासरी उपभोग प्रवृत्ती अधिक व श्रीमंत देशांतील सरासरी उपभोग प्रवृत्ती कमी असते.

उद्दिष्टे :-

1. प्रदर्शन परिणाम वस्तूच्या किमती वाढविण्यास कारणीभूत ठरतो का हे अभ्यासणे.
2. वस्तूंच्या किमती वाढल्यास व्यक्तीची बचत प्रवृत्ती कमी होते का हे अभ्यासणे.

गृहीतके :-

1. प्रदर्शन परिणाम वस्तूच्या किमती वाढविण्यास कारणीभूत ठरतो.
2. वस्तूंच्या किमती वाढल्यास व्यक्तीची बचत प्रवृत्ती कमी होते.

संशोधन पद्धती :-

सदर शोधनिबंध विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक साधन सामुग्रीचा आधार घेऊन प्रश्नावलीच्या सहाय्यानेत्याचबरोबरदुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेऊन माहिती प्राप्त केलेली आहे. आणि सदर संशोधन पेपर हा तयार केला आहे. या संशोधनात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमान पेपर, विविध मासिके, त्रैमासिक, साप्ताहिके,संशोधन पेपर, इन्टरनेट यांच्या सहाय्याने अध्ययन केले आहे.

नमुना निवड :-


नमुना निवड करतांना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या आधारे संशोधकाने वेगवेगळ्या क्षेत्रातील 30 उपभोक्त्याची निवड नमुना म्हणून केली. आणि यात प्रामुख्याने विद्यार्थी, श्रमिक, शेतकरी, बँकिंग कर्मचारी, खाजगी क्षेत्रात काम करणारे, कर्मचारी, प्राध्यापक, इत्यादी. व्यक्तीची निवड संशोधकाने केलेली आहे.

तक्ताक्र.1

प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमानावर व किमतीवर होणारा परिणाम

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 24 | 80.00 |
| 2. | नाही | 05 | 16.70 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 01 | 03.30 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे




वरील क्र.1 तक्त्यामध्ये संशोधकाने उपभोक्त्यावर प्रदर्शन प्रभावाचा परिणाम आपल्या राहणीमानावर होतो काय तसेच प्रदर्शन प्रभावामुळे वस्तूचे किमतीत वाढ होते काय, याची माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला आहे. आणि त्यासाठी संशोधकाने होय, नाही आणि निश्चित सांगता येत नाही असे तीन वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून दिले. होते त्यात होय असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 80 टक्के इतकी असून नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 16.70% इतकी होती. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या 3.30% इतकी आहे.


यावरून असे दिसून येते की, प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमान व किमतीवर परिणाम होतो. परंतु उपभोक्त्यावर होणाऱ्या प्रदर्शन परिणाम किंमत प्रभावा पेक्षा जास्त प्रभावी आहे. आणि याची माहिती प्रत्येक उपभोक्त्याला आहे की इतर व्यक्तींचे अनुकरण केल्यास आपल्या खर्चावर तसेच वस्तूच्या किमतीत वाढ होण्यावर त्याचा परिणाम दिसून येतो.

तक्ता क्र.2

प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपभोग क्षमतेत होणारा बदल

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 21 | 70.00 |
| 2. | नाही | 07 | 23.30 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 02 | 06.70 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील क्र.2तक्त्यामध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपभोग क्षमतेत काही बदल होतो का याबाबतची माहिती मिळवण्यासाठी सदर प्रश्न वेगवेगळे तीन पर्यायाच्या माध्यमाने उपलब्ध करून दिले. त्यातहोय, नाही तसेच निश्चित सांगता येत नाही असे पर्याय उपलब्ध करून दिले होते या संदर्भातील उपभोक्ता आपले मत व्यक्त करत असताना प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या उपक्षमतेत बदल होतो असे मत 70% उपभोक्त्यांनी व्यक्त केलेअसुन, 23.30% उपभोक्त्यांनी नाही असे मत व्यक्त केले, तर06.70% उपभोक्त्यांनी याबाबत निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त केलेले आहे.

यावरून असे लक्षात येते की प्रदर्शन प्रभावाचा उपभोक्त्याच्या उपभोग प्ररुत्तीवर परिणाम हा होत असतो. व उपभोक्त्याची उपभोग प्रवृतीत वाढ होत असते. आणि याची माहिती एक उपभोक्ता म्हणून बहुतांशी व्यक्तींना आहे.

तक्ता क्र.3

प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या किमतीवर होणारापरिणाम

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | वस्तूची मागणी वाढते | 27 | 90.00 |
| 2. | वस्तूची मागणी घटते | 00 | 00.00 |
| 3. | वस्तूची मागणी स्थिर राहते | 00 | 00.00 |
| 4. | निश्चित सांगता येत नाही | 03 | 10.00 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

वरील तक्ता क्रमांक 03मध्ये संशोधकांनी प्रदर्शन परिणामामुळे वस्तूच्या किमतीवर काही परिणाम होतो का, याची माहिती मिळावी याहेतूने सदर प्रश्न उपस्थित केला. त्यासाठी किमतीवर होणारा परिणाम वेगवेगळे बहुपर्यायी चार प्रश्न उपस्थित केले.आणि त्यानंतर माहिती मिळवल्या नंतर असे दिसूनआले की, प्रदर्शन परिणामा मुळे वस्तूच्या किमतीवर होणारा परिणाम काय आहे किंवा कसा होतो हे माहिती केले असता वस्तूची मागणी वाढते असे मत व्यक्त करणारे उपभोक्त्यां व्यक्तींची संख्या 90% इतकी होती. तर निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांची 10% इतकी दिसून आली. तर वस्तूची मागणी घटते किंवा वस्तूची मागणी स्थिर राहते असे एकही उपभोक्त्याने आपले मत व्यक्त केलेले नाही.


यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामा मुळे उपभोग प्रवृतीत वाढ झाल्याने वस्तूच्या गणित वाढ होऊन किंमत पातळीत वाढ होते. आणि असे असतांना देखिल अनेक उपभोक्ते वस्तूंना मागणी करतात.

तक्ता क्र.4

प्रदर्शन परिणाम आणि उत्पन्न व खर्च विषयकस्थिती

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 16 | 53.30 |
| 2. | नाही | 11 | 36.70 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 03 | 10.00 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे




तक्ता क्रमांक 4मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होते काय यासंबंधी माहिती मिळवून घेण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला. त्यासाठी बहुपर्यायी अशी तीन पर्याय उपलब्ध करून दिले. त्यात होय, नाही तसेचनिश्चित सांगता येत नाही. असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध करून दिल्यावरहोय असे मत व्यक्त करणाऱ्यांचे उपभोक्त्याचे प्रमाण 53.30% तर नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण 36.70% तसेच निश्चित सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या उपभोक्त्याचे प्रमाण 10% इतके दिसून आले.

यावरुन संशोधकाला असे लक्षात आले की उत्पन्न हे जरी अल्प आले तरी देखील प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीच्या उपभोग खर्चात मोठ्या प्रमाणात वाढहोते आणि म्हणूनच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती तयार होते याची जाणीव उपभोक्त्यास देखील दिसून येते.

तक्ता क्र.5

प्रदर्शन परिणाम आणि उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | वस्तूचीबचत प्रवृत्ती वाढते | 02 | 06.70 |
| 2. | वस्तूचीबचत प्रवृत्ती घटते | 23 | 76.70 |
| 3. | वस्तूचीबचत प्रवृत्ती स्थिर राहते | 00 | 00.00 |
| 4. | निश्चित सांगता येत नाही | 05 | 16.70 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे

तक्ता क्रमांक5 मध्ये संशोधकाने उपभोक्त्यास प्रदर्शन परिणामामुळे खर्च प्रवृत्ती वाढून बचत प्रवृत्तीवर कसा परिणाम होतो याची माहिती जाणून घेण्यासाठी बहुपर्यायीअसे चार पर्याय उपलब्ध करून दिले त्यात व्यक्तीची बचत प्रवृत्ती वाढते, व्यक्तीची बचत प्रवृत्ती घटते, व्यक्तीची बचत प्रवृत्ती स्थिर राहते किंवा निश्चित सांगता येत नाही असे पर्याय उपलब्ध करून दिले. त्यानंतर असे लक्षात आले की, उपभोक्त्यास प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती वाढते असे 6.70% व्यक्तींनी आपले मत व्यक्त केले. तर वस्तूची बचत प्रवृत्ती घटते असे 76.70% व्यक्तींनी मत व्यक्त केले, बचत प्रवृत्ती स्थिर राहते असे एकाही उपभोक्त्याने आपले मत व्यक्त केले नाही. तर निश्चित सांगता येत नाही असे 16.70% उपभोक्त्यांनी आपले मत व्यक्त केले.


यावरून असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामाच्या प्रभावामुळे व्यक्तीची उपभोग प्रवृती हि बचत प्रवृतीपेक्षा जास्त होते. ज्यामुळे एकूण उपभोक्त्याची बचतीत घट होते.

तक्ता क्र.6

प्रदर्शन परिणाम कोणत्या गटातील व्यक्तींवर सर्वाधिक होतो

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | कमीउत्पन्न गटातील व्यक्तीवर | 12 | 40.00 |
| 2. | उच्चउत्पन्न गटातील व्यक्तीवर | 09 | 30.00 |
| 3. | वरील दोन्ही उत्पन्न गटातील व्यक्तीवर | 08 | 26.70 |
| 4. | निश्चित सांगता येत नाही | 01 | 03.30 |
| | एकुण | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे





वरील तक्ताक्र 6मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक प्रभाव कोणत्या उत्पन्न गटातील व्यक्तींवर सर्वाधिक होतो याची माहिती मिळावी यासाठी बहुपर्यायी असे चार पर्याय उपलब्ध करून दिले.व त्याआधारे असे दिसून आले की,कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर 40%, उच्च उत्पन्न गटातील व्यक्तींवर 30 टक्के, कमी उत्पन्न वउच्च उत्पन्न या दोन्ही गटातील व्यक्तीवर2 6.70% तरनिश्चित सांगता येत नाही असे मत 3.30% व्यक्तींनी आपले मत व्यक्त केलेले दिसून येते.

वरील माहितीवरुन असा निष्कर्ष निघतो की, प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक परिणाम हा कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर होतो व ते आपले अल्प उत्पन्न इतर व्यक्तींच्या राहणीमानामुळे खूप मोठ्या प्रमाणात खर्च करतात. आणि एक प्रकारे आपल्यावर दारिद्रय हे ओढून घेतात.

तक्ता क्र.7 वाढलेली महागाई आणि उत्पन्न विषयक स्थिती

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 04 | 13.30 |
| 2. | नाही | 25 | 83.30 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 01 | 03.30 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे




वरील तक्ता क्र. 07 मध्ये संशोधकाने अलीकडील काळात जितक्या प्रमाणात महागाई वाढलेली तितक्या प्रमाणत उत्पन्नात वाढ झाली आहे का तसेच प्रदर्शन परिणामाचा आणि महागाईचा काही संबंध आहे का याची माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न उपस्थित केला आहे. त्याकरिता तीन वेगवेगळे पर्याय देखील उपलब्ध करून दिले त्यातूनअसे लक्षात आले की, ज्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे. त्याप्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाहीअसे मत 13.30% व्यक्तींनी व्यक्त केले. तर महागाई वाढलेली आहे परंतु उत्पन्नात तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही असे मत 83.30% उपभोक्त्यांनी व्यक्त केले असून निश्चित सांगता येत नाही. असे मत व्यक्त करणाऱ्यांची उपभोक्त्यांची संख्या 3.30% इतकी असल्याचे दिसून आले.


यावरून असे दिसून येते की, उपभोक्त्यांस या गोष्टीची जाणीव आहे की जितक्या प्रमाणात महागाई वाढलेली आहे तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही. तरी देखील आजही उपभोक्ता आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत खर्च मोठ्या प्रमाणात करतो. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रदर्शन परिणाम हेच असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.8

सर्वसामान्य व्यक्तीवर होणारा प्रदर्शन प्रभावाचापरिणाम

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 17 | 56.70 |
| 2. | नाही | 12 | 40.00 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 01 | 03.30 |
| एकुण | | 30 | 100.00 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे





वरीलतक्ता क्र.8मध्ये संशोधकाने सर्वसामान्य व्यक्तींवर प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक वापर होतो काय याची माहिती घेण्यासाठी बहुविध असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले त्यात होय असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या 56.70% इतकी, तर सर्वसामान्य व्यक्तींवर प्रदर्शन प्रवाहाचा परिणाम होत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांची संख्या 40% इतकी असल्याची दिसून आले. तर निश्चित सांगता येत नाही म्हणणाररऱ्यांचे प्रमाण 3.30% इतके होते.

यावरून असे दिसून येते की, सर्वसामान्य उपभोक्त्यावर प्रदर्शन प्रभावाचा परिणाम या पद्धतीने होतो कि व्यक्ती हा जरी सर्व सामान्य जीवन जगत असला तरी तो आजच्या या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात उपभोक्त्यांना बाजार पेठेत असंख्य विकल्प व उपभोग साधने उपलब्ध आहे. ज्याच्या विक्रीसाठी उद्योग संस्था अनेक मार्गांचा अवलंब करतात. आणि अतितंत्रज्ञानाच्या विकासामुळे अनेक वस्तूचा परीचय आज हा प्रत्येक व्यक्तीला सहज होत आहे. आणि तो आज आपल्याला प्रदर्शन परिणामाच्या स्वरुपात उपभोक्त्यावर होतांना दिसत आहे.

तक्ताक्र. 9 प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च प्रवृत्ती वाढून कर्जबाजारीपणा विषयक माहिती

| अ.क्र. | तपशिल | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 14 | 46.7 |
| 2. | नाही | 08 | 26.7 |
| 3. | निश्चित सांगता येत नाही | 08 | 26.7 |
| एकुण | | 30 | 100 |

स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे



वरील तक्ता क्र.9 मध्ये संशोधकाने प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीचे खर्च प्रवृत्ती वाढवून कर्ज बाजारीपणा वाढतो का, याची माहिती जाणून घेण्यासाठी तीन पर्याय उपलब्ध करून दिले. व त्यातून असे दिसून आले की, प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च प्रवृत्ती वाढून कर्ज बाजारीपणा वाढतो. असे मत व्यक्त करणाऱ्यांची व्यक्तीची संख्या 46.7% इतकी होती. प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीचे खर्च प्रवृत्ती किंवा बाजारीपणा वाढत नाही असे मत व्यक्त करणाऱ्यांचे प्रमाण 26.7% इतकी होती तर निश्चित सांगता येत नाही असे 26.7% व्यक्तींनी सांगितले.

यावरून असे लक्षात येते की प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढून कर्ज बाजारीपणा वाढतो याची जाणीव हि जवळपास बहुतांश उपभोक्त्यास असते.

निष्कर्ष –

1. प्रदर्शन प्रभावाचा व्यक्तीच्या राहणीमानावर व किमतीवर होणारा परिणाम हा खूप जास्त आहे. याची माहिती प्रत्येक उपभोक्त्याला आहे की इतर व्यक्तींचे अनुकरण केल्यास आपल्या खर्चावर तसेच वस्तूच्या किमतीत वाढ होण्यावर त्याचा परिणाम दिसून येतो.

2. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याच्या उपभोग क्षमतेत बदल होतो व याची जाणीव एक उपभोक्ता म्हणून असंख्य व्यक्तींना आहे.

3. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याच्या उपभोग प्रवृतीत वाढ झाल्याने मागणीत वाढ होऊन किंमत पातळीत वाढ होते. तरी देखिल अनेक वस्तूंना उपभोक्ता मागणी करतो.

4. उत्पन्न हे जरी अल्प आले तरी देखील प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीच्या उपभोग खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होते. म्हणूनच उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती निर्माण होते याची जाणीव उपभोक्त्यास देखील दिसून येते.

5. प्रदर्शन परिणामामुळे उपभोक्त्याची बचत प्रवृत्ती घटतेआणि याची जाणीव उपभोक्त्यांना असते.

6. प्रदर्शन परिणामाचा सर्वाधिक परिणाम हा कमी उत्पन्न गटातील व्यक्तींवर होतो ते आपले अल्प उत्पन्न इतर व्यक्तींच्या करत असलेल्या अनुकरणामुळे आपल्या राहणीमाणावर खूप मोठ्या प्रमाणात खर्च करतात. वएक प्रकारे आपल्यावर दारिद्र्य हे ओढून घेतात.

7. उपभोक्त्यांस या गोष्टीची जाणीव आहे की जितक्या प्रमाणात महागाई वाढलेलीआहे तितक्या प्रमाणात उत्पन्नात वाढ झालेली नाही. तरीदेखील आजही उपभोक्ता आपल्या उत्पन्नाच्या तुलनेत खर्च मोठ्या प्रमाणात करतो. आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे प्रदर्शन परिणाम हेच असल्याचे दिसून येते.

8. मध्यमवर्गीय व्यक्ती एक सामान्य जीवन जगत असला तरी तो आजच्या आधुनिक जगात झालेल्या अतितंत्रज्ञानाच्या विकासामुळे त्यांना अनेक वस्तू व सेवांचा परीचय सहज होतो. व तो उपभोग व प्रदर्शन परिणामाच्या स्वरुपात उपभोक्त्यावर होतांना दिसत आहे.

9. प्रदर्शन परिणामामुळे व्यक्तीची खर्च करण्याची प्रवृत्ती वाढून कर्जबाजारीपणा वाढतो याची जाणीव हि जवळपास बहुतांश उपभोक्त्यास असते.

संदर्भ -

1.प्रा. कृष्णराव पाटील - उच्चतर आर्थिक सिद्धांत – श्री. मंगेश प्रकाशन 23 नवी रामदासपेठ नागपूर - द्वितीय
आवृत्ती -2021

2.डॉ. सुलोचना मानकर, डॉ. प्राची देशपांडे –सूक्ष्म अर्थशास्त्राची मुलतत्वे - विसा बुक प्रकाशन आवृत्ती पहिली –

3. डॉ. जे.एफ.पाटील – साकलिक आर्थिक विश्लेषण – फडके प्रकाशन, कोल्हापूर.
4. स्त्रोत- संकलित प्राथमिक माहितीच्या आधारे